 <u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.२९/२०१३</u>
निशाण क्र.५६ लगत

<u>वादी यांचा शपथेवर पुढील उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री.एल.एल.नाथगोसावी यांचेमार्फत सुरू.</u>

३०. हे म्हणणे खरे नाही की, मी या कामी मृत्युपत्राची छायांकित प्रत हजर केली आहे. नि.क्र.४ च्या यादीवरील सहया माझ्याव माझ्या वकिलांच्या नाहीत. सातपायरी येथील आमची रूम प्रतिवादी क्र.१ याने त्याच्या नावे करून घेतली आहे त्यासाठी मी हा दावा केला आहे.

प्रश्न — त्याने ही रूम कोणत्या कागदपत्राच्या आधारे त्याच्या नावावर करून घेतली आहे ?

उत्तर — मृत्युपत्राच्या आधारे.

हे मृत्युपत्र त्याने स्वतःच लिहिले आहे. त्याने हे मृत्युपत्र दि.१५/१०/२०११ इ. रोजी लिहिले असे माझे म्हणणे आहे. मी हे मृत्युपत्र पाहिले नाही. हे मृत्युपत्र निबंधक कार्यालयात नोंदणीकृत केले होते का याची मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ ने वाडे गावात येवून कांगावा केला की, आमच्या वडिलांनी त्याच्या नावे मृत्युपत्र केले आहे, त्यावेळी मला या मृत्युपत्राबाबत समजले. त्याने मृत्युपत्राची तारीख स्वतः सांगितली होती त्यामुळे मला मृत्युपत्राची तारीख कळाली. त्याने मृत्युपत्राची तारीख दुस—या व्यक्तीला सांगितली होती, त्याच्याकडून मला मृत्युपत्राची तारीख कळाली. त्या व्यक्तीचे नाव मला माहीत नाही. मृत्युपत्राची प्रत मिळण्यासाठी मी निबंधक कार्यालयात अर्ज दिला नव्हता. मृत्युपत्रातील मजकूर मला अद्याप माहीत आहे. ज्यावेळी मी दावा दाखल केला त्यावेळी मी हा मजकूर वाचला. प्रतिवादी क्र. १ याने मला मृत्युपत्रातील मजकूर वाचायला दिला होता. त्याने मला दावा दाखल करण्यापूर्वी हा मजकूर वाचायला दिला होता. दावा दाखल करण्याच्या आठ ते पंधरा दिवस आधी त्याने मला मृत्युपत्राचा मजकूर वाचायला दाखविला होता. त्याची छायांकित प्रत मी घेतली का हे मला नक्की सांगता येत नाही.

३१. माझ्याम्हणण्यानुसार आमच्या गावामध्ये आमचे चार ते पाच सातबारा

उतारे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हा रिक्षा व्यवसाय करतो. माझे वडील पोलीस खात्यातून दि.३१/१०/१९८५ इ. रोजी निवृत्त झाले. माझ्यावडिलांचा जन्म दि.२०/१०/१९३० चा असेल, मला नक्की माहीत नाही. माझे वडील दि.०५/१०/१९४८ इ. रोजी पोलीस खात्यात नोकरीस लागले याची मला माहिती नाही. मी स्वत: माझ्यावडिलांना डॉक्टरांकडे घेवून गेलो होतो. मी डॉ. हेमंत जोशी वाडा यांच्याकडे वडिलांना घेवून जात होतो. मी माझ्यावडिलांना या डॉक्टरांकडे एक ते दोन वेळा घेवून गेलो होतो. मी वडिलांना अंदाजे कोणत्या वर्षी घेवून गेलो होतो हे मला सांगता येणार नाही. मृत्युपूर्वी किती दिवसापूर्वी मी माझ्यावडिलांना डॉ.जोशी यांच्याकडे घेवून गेलो होतो हे मला सांगता येणार नाही. डॉ.हेमंत जोशी हे एम.बी.बी.एस. पदवीधारक असतील, त्याबाबत मला नक्की माहीत नाही. डॉ. हेमंत जोशी हे मधुमेह, रक्तदाब या आजारावरचे विशेष तज्ञ डॉक्टर नाहीत. मला विसरण्याचा आजार नाही. डॉ.हेमंत जोशी यांनी मला औषधाची चिठ्ठी दिली व मी त्याप्रमाणे औषधे खरेदी केली असे घडले होते. ती चिठ्ठी अगर औषधे खरेदी केल्याची पावती माझयाकडे नाही. अनिल हा डॉक्टरांना घरी बोलवत होता. डॉक्टरांनी अनिलकडे वडिलांच्या औषधांची चिठ्ठी दिली व अनिलने औषध खरेदी केले होते असे घडले होते. अनिलकडे ती चिठ्ठी आहे का हे मला सांगता येणार नाही. मी डॉ.हेमंत जोशी यांची साक्ष नोंदविणार नाही. माझ्यावडिलांना मधुमेह आहे किंवा केस याची तपासणी करण्याकरिता मी पॅथोलॉजि लॅबमध्ये घेवून गेलो नव्हतो. मला इंग्रजी भाषा वाचता येत नाही. माझे वडील मृत्युपूर्वी ज्या खाजगी रूग्णालयात दाखल होते त्या रूग्णालयाचे नाव दाव्यात नमूद करायला मला अडचण नव्हती. मी माझ्यावडिलांची मानसिक रोग तज्ञांकडून तपासणी करून घेतली नाही. प्रतिवादी क्र.१ व्यतिरिक्त माझ्याइतर भावंडांनी मानसिक रोग तज्ञांकडून माझ्यावडिलांची तपासणी करून घेतली होती का हे मला सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र.२ ते ७ यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. हा दावा दाखल करण्यापूर्वी मी प्रतिवादी क्र.२ ते ७ यांच्याशी चर्चा केली होती. हा दावा दाखल करण्यास त्यांनी मला संमति दर्शविली होती.

३२. प्रतिवादी क्र.८ चे वय ४८ वर्षे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आज

रोजी प्रतिवादी क्र.८ ही प्रतिवादी क्र.१ च्या कुटुंबासह देवगड येथील सदनिकेमध्ये राहते. प्रतिवादी क्र.४ याने प्रतिवादी क्र.८ चे हित रक्षण केल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी देवू शकत नाही. प्रतिवादी क्र.४ ने प्रतिवादी क्र.८ चे पालनपोषण केल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी देवू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील सहदेव हे कर्तबगार पुरूष होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावडिलांनी गावात एक घर व बागेत एक घर बांधले. सदरची बाग वीरवाडी येथे आहे व घर वाडा येथे आहे. गावामधील व बागेतील घर हे वडिलोपार्जित आहे असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा मी हजर केला नाही. ( सदर दोन्ही घरे वडिलोपार्जित आहेत असे वादीचे कथन नाही, वादी याने उलटतपासामध्ये दिलेल्या उत्तराबाबत प्रश्न विचारता येणार नाही अशी हरकत वादीतर्फे विद्वान विधिज्ञांनी घेतली. वादीने ही दोन्ही घरे त्याच्या वडिलांनी बांधली या प्रश्नास नकारार्थी उत्तर दिले आहे, वादी प्रतिवादी यांच्या वडिलांचे स्वउत्पन्नाबाबत वाद विषय आहे, त्यामुळे हा प्रश्न आवश्यक आहे असे मला वाटते. सबब, हरकत फेटाळणेत येते. ) मला संधी मिळाल्यास मी तसा कागदोपत्री पुरावा हजर करू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावडिलांना सेवानिवृत्ती नंतर सुमारे आठ ते दहा हजार प्रति महिना निवृत्ती वेतन होते. माझ्यावडिलांना निवृत्ती वेतन किती होते याचा कागदोपत्री पुरावा मी देवू शकत नाही. माझे स्वत:चे उत्पन्नाचे साधन शेती आहे. मला शेतीतून वार्षिक रू. २,०००/— उत्पन्न मिळते. या व्यतिरिक्त मला माडांचे उत्पन्न आहे. माडांपासून वार्षिक रू.२,०००/— उत्पन्न मिळते. ही माड बाग खाली गावामध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, ही माड बाग शांतारामने आपल्या हिश्श्यात विकसीत केली आहे व सहदेवने त्याच्या हिश्श्यात विकसीत केली आहे. माझे आजोबा रावजी कधी मयत झाले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, रावजी याने वडिलोपार्जित पैकी कोणतीही मिळकत विकसीत केली नाही. रावजी हे पोलीस खात्यात नोकरीस होते. ते पोलीस खात्यात नोकरीला असल्याबाबतचा माझयाकडे पुरावा नाही. रावजी यांनी वीरवाडी, वाडातर येथील मिळकती विकसीत केल्या असे माझे म्हणणे आहे. रावजी यांनी वीरवाडी, वाडातर येथील मिळकती विकसीत केलेबाबतचा कागदोपत्री पुरावा माझयाकडे नाही. ( रावजीने विकसीत केलेल्या मिळकतीबाबतचा

कागदोपत्री पुरावा देण्याची जबाबदारी वादीची नाही, सदरचा प्रश्न हा उलटतपासादरम्यान विचाराण्यात आलेल्या प्रश्नास दिलेल्या उत्तरावरून विचारण्यात आला आहे. त्यामुळे असे प्रश्न विचारता येणार नाहीत अशी हरकत वादीतर्फे विद्वान विधिज्ञांनी नोंदविली.) वीरवाडी येथील जमीन रावजी यांनी खरेदी केली. रावजी यांनी किती रूपयांना ही जमीन खरेदी केली हे मला सांगता येणार नाही. रावजी यांनी किती साली ही जमीन खरेदी केली याची मला माहिती नाही. त्यांनी ही जमीन कोणाकडून खरेदी केली हे मला सांगता येणार नाही. वीरवाडी येथील मिळकतींचे फेरफार मी तपासले नाहीत. वीरवाडी येथील जमीनीचे ठिकाणाचे नाव आंबाडयाची व्हाळी असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, वीरवाडी येथील जमिनीमध्ये कलमे लावण्याचे काम गोगटे यांना दिले होते. या मिळकतीच्या सभोवताली कुंपण आहे. हे कुंपण घालण्याचे काम शंकर बाईत यांना दिले होते हे मला सांगता येणार नाही. घर क्र.२५६ हे बागेतील आहे की गावातील आहे हे मला सांगता येणार नाही. गावातील घर बांधण्याचे कंत्राट चिंतामण हरि मेस्त्री यांना दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई सन १९९७ साली मयत झाली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याआईला मधुमेह होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याआईच्या आजारपणाचा खर्च माझे वडील करत होते. रावजी याने त्यांच्या हयातीमध्ये किती आंबा कलमे लावली हे मला सांगता येणार नाही. माझे वडील नोकरीमध्ये असताना त्यांनी जागा खरेदी केली व घर बांधले यामुळे त्यांची खातेनिहाय चौकशी झाली होती याची मला माहिती नाही. वीरवाडीच्या बागेचा सर्व व्यवहार माझे वडील पाहत होते. माझे वडील बागेतील येणारे उत्पन्न बॅकेत ठेवत होते का हे मला सांगता येणार नाही. माझे वडील बागेतील येणारे उत्पन्न घरी ठेवत होते का हे मला सांगता येणार नाही. माझी आई हयात असताना नोकरीस नव्हती. वीरवाडीची बाग खरेदी करण्यापूर्वी माझ्याआईला शेतीपासून उत्पन्न नव्हते. माझी आई केवळ आमचा सांभाळ व घरकाम करत होती. प्रतिवादी क्र.१ चे लग्न माझ्यावडिलांनीच करून दिले. माझे देखील लग्न माझ्यावडिलांनीच करून दिले. माझ्याअन्य भावंडांची लग्न माझ्यावडिलांनीच केले. माझ्यावडिलांनी माझ्यापत्नीस दागिने घातले होते. माझ्यावडिलांनी यथाशक्ती इतर भावंडांच्या लग्नात देखील दागिने घातले होते. वीरवाडी येथील बाग व माड बागायत व्यतिरिक्त उर्वरित मिळकतीतून आम्हा

निशाण क्र.५६ लगत

भावंडांना उत्पन्न मिळकत नाही. वीरवाडी येथील बाग व माड बागायत व्यतिरिक्त उर्वरित मिळकतीमध्ये ८ ते १० कलमे आहेत. सहदेवच्या हयातीत या उर्वरित मिळकतीत किती कलमे होती याची मला माहिती नाही. त्यावेळी सहदेव याला या कलमांतून वार्षिक दहा ते पंधरा हजार रूपये मिळत होते. सात ते आठ वर्षापासून सहदेवला या कलमांपासून उत्पन्न बंद झाले. सहदेव याला दरमहा किती पगार होता याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वीरवाडी येथील कलम बाग सहदेव याने खरेदी केली व त्याचा मोबदला सहदेवनेच दिला.

न्यायालयाचा वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारीखपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.२२/३/२०१८.

सही/—

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड